# ठोस पावले उचला

## गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे एक प्रवचन

### शनिवार, ३१ ऑक्टोबर, २०२०

*शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजी बाबा मुक्तानंदांच्या ३८व्या महासमाधी दिनाप्रीत्यर्थ श्रीगुरुमाईंच्या सान्निध्यात सिद्धयोग महोत्सव सत्संगाचे आयोजन करण्यात आले. एस. वाय. डी. ए. फाउंडेशनद्वारे निर्मित हा सत्संग श्री मुक्तानंद आश्रमातील भगवान नित्यानंद मंदिरातून थेट व्हिडिओ प्रसारणाद्वारे आयोजित केला गेला.*

*या सत्संगाचे शीर्षक होते, "दिव्य विश्रांतीच्या लोकात वास करा." श्रीगुरुमाईंनी सुरुवातीला हे शीर्षक वर्ष २०२०च्या सिद्धयोग शक्तिपात ध्यान-शिबिराला दिले होते. परंतु, महामारीमुळे या वर्षी शक्तिपात ध्यान-शिबिर झाले नाही, म्हणून श्रीगुरुमाईंनी असे सांगितले की, हे शीर्षक या सत्संगाला देण्यात यावे.*

*सत्संगाचा प्रारंभ "बाबांना आदरांजली' या व्हिडिओद्वारे झाला आणि मग सिद्धयोग वैश्विक हॉलमधील सर्व उपस्थितांनी बाबा मुक्तानंदांचे परमप्रिय श्रीगुरू, भगवान नित्यानंद यांची आरती केली. त्यानंतर, स्वामी ईश्वरानंद यांनी बाबांचे जीवन आणि त्यांचा वारसा तसेच जगभरातील हजारो जिज्ञासूंच्या अंतरी बाबांनी केलेल्या ज्योती-जागृतीविषयी सांगितले.*

*आपण श्रीगुरुमाईंसोबत श्रीगुरुगीतेचे पठण केले तसेच राग यमन कल्याणमध्ये 'ॐ नमः शिवाय' हे संकीर्तन केले. श्रीगुरुमाईंनी अनेकदा सांगितले आहे की, हे नामसंकीर्तन बाबांच्या काळापासून मुलांना अतिशय प्रिय आहे.*

*पठणानंतर श्रीगुरुमाईंनी हे प्रवचन दिले.*

*~ ईशा सरदेसाई*

बाबा मुक्तानंदांची महासमाधी—अडतिसावी पुण्यतिथी. या प्रसंगाच्या सन्मानार्थ तुम्ही श्रीगुरुगीतेचा अभ्यास केला आहे. तुमच्या गायनात किती गोडवा होता. तुमच्या भक्तिभावामुळे त्यात गोडवा आला होता. भगवान नित्यानंदांच्या पूजेत मला मदत करत असताना लहानग्या रोहितमध्ये असलेल्या भक्तिभावाप्रमाणेच तुमचे गायन सुमधुर होते.

इथे असल्याबद्दल तुम्ही खूश आहात ना? तुम्ही तिथे असल्याबद्दल खूश आहात ना? सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये तुम्ही जिथे-जिथे आहात, तिथे खूश आहात ना?

उपनिषदांमध्ये, ऋषिमुनी परम आत्म्याविषयी सांगतात. आत्मा नेत्रांविना पाहतो. आत्मा कानांविना ऐकतो. आत्मा नाकाविना वास घेतो. आत्मा जिभेविना स्वाद घेतो. आत्म्याला कोणत्याही वस्तूविना स्पर्श जाणवतो. महामारीच्या या कठीण समयी, मी असे अवश्य म्हणेन की, ऋषिमुनींच्या शिकवणी माझ्यासाठी अधिकच जिवंत झाल्या आहेत.

संपूर्ण जगासाठी लॉकडाउन हे चिंतेचे फार मोठे कारण आहे, आणि ते साहजिकच आहे.

भारतात लहानाचे मोठे होणे आणि गुरुदेव सिद्धपीठामध्ये जाणे, हे मला आठवते. एकदा का आम्ही आश्रमात आलो की, आम्ही *आश्रमातच* असायचो. आमचे लक्ष सेवा अर्पित करण्यावर केंद्रित असल्यामुळे आम्ही आश्रमाचा परिसर सोडून बाहेर जातच नसू. पण आम्हाला ते कधीही लॉकडाउनसारखे वाटले नाही. आम्हाला एवढेच माहीत होते की, आम्हाला आश्रमात राहायचे आहे—आणि आम्ही आश्रमातच *होतो!* जोपर्यंत आम्ही तिथे असायचो, तोपर्यंत दुसरे काहीही महत्त्वाचे नव्हते.

त्यामुळे, लॉकडाउनचा हा कालखंड म्हणजे असे वाटते की, जणू आपण एका आध्यात्मिक वातावरणात आहोत. सर्व गोष्टींना एक "अत्युच्च" तत्त्वज्ञान बनवून बेजबाबदार बना असे मी म्हणत नाही. आत्ता जे काही घडते आहे त्याला तत्त्वज्ञानात परिवर्तित करण्याचा हा मुद्दा नाही. तरीदेखील तत्त्वज्ञानाचे वास्तव ज्ञान असणे—सच्चे तात्त्विक प्रज्ञान असणे—खरोखरच साहाय्यक असते. ही एक सवय बनवा की, कधीही काहीही घडले, तरी तुम्ही त्याकडे ज्ञानाच्या, प्रज्ञानाच्या आणि शास्त्रग्रंथांमधील शिकवणींच्या भिंगातून पाहाल.

अकल्पित परिवर्तनाच्या प्रबळ वादळांनी प्रभावित होणे अगदी सोपे असते. तुम्ही जेव्हा दडपणाखाली असता, तेव्हा आपल्या शक्तीचा त्याग करणे अतिशय सोपे असते. भयाच्या भावनेवर निर्भर राहणे खूप सोपे असते. प्रत्येक बाबतीत भयाकडे वळणे सोपे असते. "मी भयभीत आहे. मी घाबरलो आहे. मी भयाकुल झालो आहे. मला धास्ती वाटते आहे. माझे हातपाय गळून गेले आहेत. माझा थरकाप होतो आहे. मी भीतीने थिजून गेलो आहे."

एकदा का तुम्ही भीतीच्या साम्राज्यात गेलात की मग तुम्हाला त्यातून कोण ओढून बाहेर काढेल असे तुम्हाला वाटते? तुम्हाला माहीत नाही का? तुम्ही ते आहात, ज्याची तुम्ही रचना करता. तुम्ही ते आहात, जे तुम्ही करता. म्हणून, साधनेची फळे अनुभवण्यासाठी आणखीन प्रयत्न करणे अधिक चांगले आहे. कारण एकदा का तुम्हाला आढळले की, तुम्ही त्या स्थानी आहात जिथे तुम्ही तुमचा चांगुलपणा अनुभवता, जिथे तुमचे सद्‌गुण वास करतात—मग तुमच्या लक्षात येते की, सगळेजण कसे तुमच्याकडे येतात, कारण त्यांना माहीत असते की, तुमच्याकडे असे काही आहे ज्याचा तुम्हाला लाभ होतो आहे. तुमच्याकडे उत्तम असे काही तरी आहे जे त्यांना नवस्फूर्तीने व्यापून टाकेल.

स्मरणात ठेवा : तुम्ही जर भीतीच्या साम्राज्यात गेलात, तर कोणालाही तुमच्या आसपास राहावेसे वाटत नाही. ते तुम्हाला एकटे सोडतील. अशा प्रकारचा एकटेपणा म्हणजे तो सुखद एकांत नव्हे ज्याचा उल्लेख भारतीय शास्त्रग्रंथांमध्ये केला आहे. हा एकटेपणा मधमाशांच्या पोळ्याप्रमाणे असतो—त्याला कोणीही स्पर्श करू इच्छित नाही.

तथापि, तुम्ही जर स्वतःला त्या ज्ञानाने अलंकृत केले, जे तुम्हाला उन्नत करते, तर तुम्ही एका नंदनवनाची निर्मिती करता आणि प्रत्येकाला *तुमच्या* नंदनवनामध्ये येऊन विहार करावासा वाटतो. हे खरे नाही का? कोणाला नरकात जावेसे वाटेल? मला नाही वाटत की, कोणालाही तिथे जावेसे वाटत असेल. लोक जेव्हा रागे भरतात, तेव्हा कदाचित ते तुम्हाला म्हणू शकतात की, “नरकात जा,” पण तुम्ही स्वतःला सांगता, “मला त्याहून अधिक चांगले ठिकाण माहीत आहे.”

तेव्हा, आपण एका कठीण समयामध्ये आहोत, आणि असे वाटते की, हा कालखंड वाढतच चालला आहे. जो कोणी बातम्या वाचतो, त्याने हे ऐकले आहे की, हा आव्हानात्मक काळ वाढतच चालला आहे. हे जणूकाही व्हिसाचा अवधी वाढवण्यासारखेच आहे. पण केवळ एक व्हायरस असा आहे की, जो सरकारी कायद्याच्या आवाक्याबाहेरचा आहे. या व्हायरसचा नायनाट कोणीही करू शकलेले नाही. हा तो पळपुटा आहे, जो सर्वात निष्णात आणि प्रख्यात अशा शास्त्रज्ञांच्या नैपुण्याला आव्हान देतो आहे. तो मानवजातीशी खेळतो आहे, डोळे मिचकावत जणू तो आपल्याला असे म्हणतो आहे, “मी काही मूर्ख नाही.”

तेव्हा, कदाचित तुम्ही विचाराल की, या व्हायरसचा ‘व्हिसा अवधी’ कोणी वाढवला आहे. चला, यावर विचार करू या. हूंऽऽऽ. हे शोधून काढण्यास आपल्याला किती वेळ लागणार आहे? ते *कोण* असू शकेल? हत्ती? देवमासे? जिराफ? पाणघोडे? डायनोसॉर्स?

ठीक आहे. . . चला आपण स्वतःसमोर एक आरसा धरू या आणि पाहू या. ते तर आपणच आहोत! या पृथ्वी ग्रहावरील लोक आहेत ते. मानवजातीनेच या रोगाचा अनियंत्रितपणे, अनिर्बंधपणे फैलाव

होऊ दिला आहे—जे लोक असे समजतात की ते खूप-खूप चलाख आहेत; जे लोक असे समजतात की, ते काय करत आहेत हे त्यांना माहीत आहे; जे लोक असा विचार करतात की, त्यांना शास्त्रज्ञांची गरज नाही; जे लोक असे समजतात की, त्यांनी त्याला अचूक हेरले आहे आणि जे लोक असा विचार करतात की, त्यांना कशाचीच फिकीर नाही.

तर मग हेच ते लोक नव्हेत का, जे या व्हायरसचा फैलाव करत आहेत आणि त्याचा व्हिसा आणखी वाढवतच आहेत, वाढवतच आहेत, *वाढवतच* जात आहेत? *व्हिसा. व्हायरस. विजय.* हे सर्व शब्द एकाच पद्धतीने कसे सुरू होतात हे विचार करण्याजोगे आहे.

या व्हायरसवर विजय कसा मिळवावा? हे प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून आहे. इतिहास सांगतो की, महामारी कधी संपेल हे लोकच ठरवत असतात.

महामारीमुळे आलेल्या थकव्याविषयीदेखील मी ऐकले आहे. हे अजबच आहे : लोक महामारीमुळे आलेल्या थकव्याविषयी बोलत आहेत. ते महामारीमुळे आलेल्या नैराश्याबद्दल बोलत आहेत. ते महामारीमुळे होत असलेल्या जीवितहानीविषयी बोलत आहेत. ते महामारीमुळे गमावलेल्या नोकऱ्यांविषयी बोलत आहेत आणि त्यांना हताश वाटते आहे. मी हे पाहू इच्छिते की, आपले हात झटकून टाकण्याऐवजी लोकांनी काहीतरी सकारात्मक करावे—त्यांनी अशा घातक व्हायरसच्या परिणामांवर आणि प्रभावांवर मात करण्यासाठी छोटी-छोटी पावले उचलावीत.

जेव्हा-जेव्हा तुम्ही शास्त्रज्ञांचे किंवा तज्ज्ञांचे बोलणे ऐकता, तेव्हा प्रत्येक वेळी ते म्हणतात, “अजूनही बरेच काही आहे या व्हायरसबद्दल ज्याची आम्हाला माहिती नाही.” जेव्हा तज्ज्ञ मंडळी असे बोलत आहेत, तेव्हा आपल्याला अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. हे तसेच आहे जेव्हा तुमच्या लहानपणी तुमचे आईवडील तुम्हाला सांगतात की, *त्यांना* एखादी गोष्ट माहीत नाही—तेव्हा तुम्हाला थोडे सावध राहावे लागते. तुमच्या आईवडलांना जर एखादी गोष्ट माहीत नसेल, तर त्याचा अर्थ सामान्यतः असा होतो की, तुम्ही ती गोष्ट करू नये. अर्थात, एकदा तुम्ही प्रौढ झालात की, काय करायचे ते तुम्ही स्वतःच शोधून काढाल. पण आत्ता मी तुमच्या बालपणाविषयी बोलते आहे. आणि याबाबतीत, आपल्यापैकी जे कोणी शास्त्रज्ञ किंवा तज्ज्ञ नाहीत, त्यांनी तज्ज्ञांच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

जर संबंधित तज्ज्ञमंडळी उलथापालथीच्या या काळात आपल्याला काही सल्ला देत असतील, तर तो ऐकणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सुरक्षित राहणे आणि लॉकडाउनमध्ये असणे याविषयी आदळआपट करण्याऐवजी आणि किंचाळत राहण्याऐवजी, असा विचार करा की, हा *तुमचा* काळ आहे. आता तुम्हाला वेड लागेल असे जर तुम्हाला वाटू लागले असेल, तर विचार करा, उदाहरणार्थ, ही परिस्थिती हाताळण्याचे कसब तुम्ही तुमच्या मुलाबाळांना कसे शिकवाल. काहीही जरी घडत

असले, तरी तुमच्याकडे एक कारण आहे खूश दिसण्याचे, खूश राहण्याचे, खूशीची रचना करण्याचे—कारण तुम्हाला माहीत आहे की, तुमचे मूल तुमच्याकडे एक आदर्श म्हणून पाहते आहे, त्याला अशी आशा आहे की तुम्ही त्याला सर्वोत्तम गोष्टीच द्याल. त्याचप्रमाणे, उर्वरित जगाला जरी असे वाटत असले की ते स्वतः कठीण समस्येत आहे, तरीदेखील तुम्ही तुमच्या ज्ञानापर्यंत, तुमच्या प्रज्ञानापर्यंत पोहोचलेच पाहिजे. तुम्ही ते करू शकता.

खरेतर, या वर्षीच्या मार्च महिन्यापासून श्री मुक्तानंद आश्रम हा पूर्णतया लॉकडाउनमध्ये आहे. तुमच्या स्वतःच्या जीवनात जेव्हा सुयोग्य लोक उत्तरदायित्व घेतात, तेव्हा तुम्ही ते घडवून आणू शकता. त्याकडे तुम्ही तात्त्विक दृष्टिकोनातून का पाहत नाही? *जे काही घडते ते भल्यासाठीच घडते* या शिकवणीवर तुम्ही जर विश्वास ठेवला असेल, तर स्वतःला विचारा : ती फलनिष्पत्ती सुनिश्चित करण्यासाठी माझा धर्म काय आहे?

स्वतःकडे आणि स्वतःच्या कृतींकडे अधिक खोलवर दृष्टी टाकावी असे तुम्हाला वाटत नाही का? स्वतःवर नजर टाकावी असे तुम्हाला वाटत नाही का? तुमच्या हृदयाकडे जाणाऱ्या मार्गावर तुम्ही कोणते अवरोध निर्माण करून ठेवले आहेत? तुम्हाला जरी असे वाटत असले की, तुम्ही तुमच्या हृदयापर्यंत पोहोचू शकत नाही, तरीदेखील स्वतःच्या हृदयाकडे जाणाऱ्या मार्गावर तुम्ही जे अवरोध निर्माण करून ठेवले आहेत ते काढण्यात तुम्ही स्वतःला व्यस्त ठेऊ शकता. खरे पाहता आपल्या हृदयात प्रवेश करणे अवघड नाही. तुम्ही निर्माण केलेल्या सर्व समस्यांमुळे आणि परिस्थितींमुळे ते करणे कठीण होते. म्हणून, ज्याप्रमाणे तुम्ही आश्रमातील, तुमच्या घरातील आणि तुमच्या कार्यालयातील मार्ग स्वच्छ करता, त्याचप्रमाणे तुमच्या हृदयाकडे जाणारा मार्ग स्वच्छ करा. हे एका प्रसिद्ध चित्रकाराच्या त्या गोष्टीप्रमाणे आहे जी मी सत्संगामध्ये सांगत असे. तो रंगकाम करत नसे—तो फक्त आरसा स्वच्छ करत असे, कारण त्याच्या सभोवताली सौंदर्य तर आधीपासूनच उपस्थित होते. त्या सौंदर्याला केवळ प्रतिबिंबित होण्याची आवश्यकता होती.

आपल्या आंतरिक सौंदर्याचा, आपल्या आंतरिक आनंदाचा अनुभव घेण्याचे वचन तुम्ही स्वतःला द्याल का? दुःख—दुःखाची भीती बाळगू नका. अप्रसन्नता—अप्रसन्नतेची भीती बाळगू नका. त्यावर आरूढ होऊन बाहेर पडा. किती लाटा किनाऱ्यावर येऊन आदळत राहतात? सर्फिंग करणाऱ्यांना म्हणजेच लाटांवर आरूढ होणाऱ्यांना हे माहीत असते की, कोणती लाट आरूढ होण्यासाठी सर्वात योग्य आहे. त्याचप्रमाणे, तुमच्या अंतरी अनेक भावना उद्भवतील. तथापि, अशी *एक* भावना असेल, जिचे अनुसरण करावे—*तिच्यावर* आरूढ व्हा! तुमच्या स्वतःच्या भावनांबाबत जोखीम पत्करा. आनंदाच्या त्या लाटेवर आरूढ व्हा आणि आनंदाची रचना करा, स्वास्थ्याची रचना करा, सौंदर्याची रचना करा, चमत्कारांची रचना करा.

हे रोचक आहे, होय ना? तुम्ही चमत्कारांची रचना कशी करता? यावर विचार करा. तुम्ही स्वतःच्या अंतरी योग्य स्थानी असल्याचे जर तुम्हाला आढळून आले, तर चमत्कार घडतात—अगदी सहजच.

आज, सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये, एस. वाय. डी. ए. फाउंडेशनद्वारे प्रायोजित या थेट व्हिडिओ प्रसारणादरम्यान झालेले श्रीगुरुगीतेचे पठण किती कर्णमधुर होते. खरोखरच, अतिशय *स्वादिष्ट.* मी जेव्हा श्रीगुरुगीतेचे पठण करत होते, तेव्हा त्या क्षणी मला नवनवीन पद्धतींनी गाण्याची इच्छा होत होती. जेव्हाजेव्हा मी अनुभवते की, एखादी गोष्ट सुंदर आहे, एखादी गोष्ट प्रवाहशील आहे, एखादी गोष्ट उत्कृष्ट आहे—त्या क्षणी मला अधिक सुंदर रचना करावीशी वाटते, मला फक्त गावेसे वाटते. तर त्यामुळेच मला जाणवले की, आज श्रीगुरुगीतेचे आपले पठण बडे बाबांनी स्वीकारले आहे आणि हेदेखील की, बाबा मुक्तानंद अतिशय प्रसन्न आहेत. *जय जय.*

पौर्णिमा कधी असणार याचे स्मरण ठेवल्याबद्दल धन्यवाद. हो, ती आज आहे! आणि काही देशांमध्ये आज डे लाईट सेव्हिंग्स टाईम म्हणजे दिवसाचा प्रकाश उपयोगात आणण्यासाठी एक तास मागे जाण्याचा दिवसदेखील आहे. अमेरिकेत आज हॅलोवीनही आहे. हा तो दिवस असायचा जेव्हा प्रौढ लोक प्रकाशाला आलिंगन देत आणि आता मुले टॉफीच्या रूपात प्रकाशाला आलिंगन देतात. किती गोड!

आपण श्रीगुरुगीतेच्या पठणाच्या रूपात मिठाई खाल्ली आहे आणि आता आपण टॉफीच्या रूपात तो गोडवा आपल्या मुलांना वाटण्यासाठी तयार आहोत. मुलांचे हास्य गोड असते. त्यांचा आवाज गोड असतो. मी खूश आहे की, रोहितच्या आईवडलांनी श्री मुक्तानंद आश्रमात सेवा अर्पण करण्याचे ठरवले आहे आणि तो आश्रमात मोठा होतो आहे. मला त्याचा आवाज ऐकणे फार आवडते.

मी मुलांना नेहमी सांगते, “तुमचा आवाज सदैव असाच ठेवा.” ते माझे कधीच ऐकत नाहीत. कधीच नाही. ते बारा वर्षांचे होतात, ते तेरा वर्षांचे होतात, ते चौदा वर्षांचे होतात आणि त्यांचे आवाज बदलतात. एवढेच नाही, तर जगत त्यांना मोहून टाकते आणि ते या जगताला मोहून टाकतात—आणि मग, अखेरीस, बऱ्याच वर्षांनंतर असा एक क्षण येतो की ते शोध घेत येतात. आणि महान विभूती म्हणतात : “माझ्या बाळा, तू परतला आहेस.”

तुमच्या आसपास जर मुले असतील, तर कृपया त्यांना वेळ द्या, त्यांच्यासोबत खेळण्यासाठी आणि त्यांना शिकवण्यासाठी. त्यांच्या संगतीचा आनंद घ्या. ते आपल्या संगतीचा भरपूर आनंद घेतात. त्यांना सांगा की, तुम्हाला त्यांची संगत किती आवडते. तुम्ही बालकांना जेव्हा थोडेसे प्रेम देता, तेव्हा ते भरपूर बनते. प्रौढ व्यक्तीच अशा असतात की त्यांना तुम्ही कितीही प्रेम जरी दिले, तरी त्यांना अधिक, अधिक आणि अधिकच हवे असते. परंतु एका बालकाच्या बाबतीत मात्र प्रेमाचा एक थेंबदेखील त्याला अतिशय सुंदर व्यक्ती बनवण्यास साहाय्य करतो. तेव्हा, आपल्या मुलाबाळांसोबत

राहण्यासाठी, इतरांच्या मुलाबाळांसोबत राहण्यासाठी वेळ काढा. जर तुमच्या आसपास मुले नसतील, विशेषतः या लॉकडाउनच्या काळामध्ये, तर त्यांच्याविषयी विचार करा. त्या मुलांविषयी विचार करा ज्यांना तुम्ही ओळखता. त्या मुलांविषयी विचार करा ज्यांच्याशी तुमची ओळख होईल. त्या मुलांविषयी विचार करा ज्यांना तुम्ही जन्माला घालणार आहात. जगभरातील मुलांविषयी विचार करा.

अलीकडेच, एके दिवशी रोहित आणि मी बडे बाबांच्या पादुकांची पूजा करत होतो. तो पादुकांवर अक्षत वाहण्याआधी मी त्याला सांगितले, "अक्षत वाहण्याआधी बडे बाबांना सांग, 'बडे बाबा, या जगात भुकेले असलेल्या सर्व मुलांना जेवण मिळावे ही माझी इच्छा आहे.'" आणि मग, आज आम्ही पुन्हा जेव्हा पादुकांची पूजा करत होतो, रोहित चांदीच्या पादुकांवर अक्षत वाहत होता, तेव्हा तो पुन्हापुन्हा म्हणत होता, "हा ध्वनी किती सुंदर आहे." अक्षतांचा पादुकांना स्पर्श होताना निर्माण होणाऱ्या ध्वनीच्या बाबतीत तो बोलत होता.

बडे बाबांना लहान मुलांविषयी *अतिशय प्रेम* होते. तुम्हाला जर लहान मुलांसाठी प्रार्थना करायची असेल, तर प्रार्थना करण्यासाठी बडे बाबा हे सर्वश्रेष्ठ दैवत आहेत, महानतम गुरू आहेत, कारण लहान मुलांसाठी त्यांचे प्रेम अपरिमित होते.

जर तुम्हाला लहान मुलांना साहाय्य करायचे असेल, तर मुलांची देखभाल करणाऱ्या विविध धर्मादाय संस्थांच्याद्वारे तुम्ही त्यांना साहाय्य करू शकता. जर तुमच्याकडे अतिरिक्त खेळणी असतील, तर ती मुलांना देण्यासाठी तुम्ही मार्ग शोधू शकता. एखाद्या ठिकाणी जर तुम्हाला निराधार मुले दिसली, तुम्ही त्यांचे फोटो किंवा व्हिडिओ जर पाहिलेत, किंवा तुम्ही त्यांच्याविषयी ऐकले, तर क्षणभर वेळ काढून तुम्ही तुमचे प्रेमासिक्त अश्रू, तुमचे प्रचुरतासिक्त अश्रू, तुमचे मधुरतासिक्त अश्रू त्यांना अर्पण करा. माझ्या सबंध आयुष्यभर मी हे केले आहे आणि आताही करते. अलीकडेच, काही दिवसांपूर्वी मी टेक्सासमध्ये नदीकिनारी असाहाय्य निराधार मुलांचे फोटो आणि व्हिडिओ पाहिले—आणि होय, त्यांच्यासाठी मी प्रार्थना केली, मी त्यांच्यासाठी ध्यान केले.

तुम्ही जर भौतिक रूपाने काही करू शकत नसाल, तर हे सुनिश्चित करा की तुमचा संकल्प दृढ आहे. तुमच्या संकल्पाद्वारे मुलांना मदत करा. उपलब्ध असलेल्या सर्व साधनसामुग्रीद्वारे त्यांना मदत करा. लक्षात ठेवा की, मुले या पृथ्वी ग्रहाचे भविष्य आहेत.

तुम्हाला जर तुमच्या देशाचे अस्तित्व टिकवायचे असेल, तर तुम्हाला पावले उचलावी लागतील. केवळ बातम्या वाचून आणि त्याविषयी बोलून खरोखर काहीच साध्य होणार नाही. चांगले परिणाम घडवून आणण्यासाठी तुम्हाला ठोस पावले उचलावी लागतील. ठोस पावले उचला. ठोस पावले उचला. अन्न, वस्त्र आणि निवारा सगळ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे आहेत.

आणि आता पुन्हा एकदा आपण ‘ॐ नमः शिवाय’ची तीन आवर्तने गाऊ आणि मग सद्गुरुनाथ महाराज की जय म्हणू या! हा क्षण अविश्वसनीयरीत्या मौल्यवान आहे. तेव्हा तुमचा संकल्प करा. मी आत्ता ज्याविषयी बोलले, त्याच्या आधारे संकल्प करा. संकल्पासह नामसंकीर्तन करा.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.